## महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्चमाध्यमिक शिक्षणमंडळ,
## नाशिकविभागीय मंडळ,नाशिक—४२२००३.

परिपत्रक क्र./नाविमं/लेखा/नोंदणी शुल्क/२०२१—२०२२/ ७१० , दिनांक :—२२/०७/२०२१ २६

**विषय:— नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण शुल्क भरणेबाबत....**

नाशिक विभागीय मंडळाच्या कार्यक्षेतील सर्व मंडळ मान्यता प्राप्त शाळा/क.महाविद्यालय प्रमुखांना या परिपत्रकान्वये कळविण्यात येते की, सन २०२१-२०२२ या शैक्षणिक वर्षाचे नोंदणी शुल्क खाली नमुद केलेल्या दराने इ.१०वी /इ.१२वी च्या नियमित विद्यार्थी संख्येप्रमाणे नोंदणी शुल्क व शाळा/महाविद्यालयांनी शिक्षण संक्रमण शुल्क रु.५००/— प्रमाणे दिनांक १० ऑगस्ट २०२१ पुर्वी विभागीय मंडळाकडे बँक ऑफ इंडिया मध्ये दोन स्वतंत्र चलनाद्वारे जमा करण्यात यावेत.

| तपशिल | नोंदणी शुल्क | | शिक्षण संक्रमण शुल्क | |
|---|---|---|---|---|
| | इ.१०वी | इ.१२वी | इ.१०वी | इ.१२वी |
| १ ते १०० विद्यार्थ्यांकरीता | रु.१०००/— | रु.१०००/— | ५००/- | ५००/- |
| त्यापुढीलप्रत्येक १००विद्यार्थ्यांसाठी | रु.२००/— | रु.४००/— | | |

उपरोक्तदराप्रमाणे नोंदणी शुल्क दिनांक **१० ऑगस्ट २०२१** पूर्वी विभागीय मंडळाकडे जमा न केल्यास निर्धारित नोंदणी शुल्काव्यतिरिक्त खालील प्रमाणे दंडात्मक जादा रक्कम भरावी लागेल, याची नोंद घ्यावी.

| अ. क्र. | तपशिल | दंडाची रक्कम | |
|---|---|---|---|
| | | इ.१०वी | इ.१२वी |
| १ | **११ ऑगस्ट ते ३१ ऑगस्ट २०२१** | रु.२००/— | रु.२००/— |
| २ | **१ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर २०२१** | रु.३००/— | रु.३००/— |
| ३ | १ ऑक्टोबर २०२१ नंतर नियमित विद्यार्थ्यांची आवेदनपत्र सादर करण्याच्या तारखेपर्यंत | रु.५००/— | रु.५००/— |

**विशेषसूचना**

१. नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण शुल्क मंडळाकडे बँक ऑफ इंडियाच्या **चलनाद्वारेच** स्वतंत्ररित्या जमा करण्यात यावे.

२. नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण शुल्काचे चलन गुरुवार **दिनांक १२/०८/२०२१** पर्यंत मंडळ कार्यालयात भरलेले चलन पोस्टाने किवा हस्तपोहच जमा करावे.

३. लनातील सर्व माहिती परिपूर्ण भरून चलनावर विद्यार्थी संख्येची नोंद करणे आवश्यक आहे.

४. **दि.१० ऑगस्ट २०२१** नंतर नोंदणी शुल्क भरल्यास नोंदणी शुल्क दंडाची रक्कम वर नमुद केल्याप्रमाणे दोन्ही एकत्रित शुल्क भरणे आवश्यक राहील.

५. नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण शुल्क मंडळाकडे पाठवितांना सोबत पाठविलेल्या नमुन्यातील पत्रावर शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाचा सांकेतिक क्रमांक इ.१०वी/इ.१२वी नियमित विद्यार्थी संख्या, चलन क्रमांक, दिनांक, एकुण रक्कम, बॅकेचे नाव इ.बाबी नमुद केलेल्या असाव्यात.

६. ज्या शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांचे वर्ग संलग्न असतील अशा शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी **इ.१०वी/इ.१२वी साठी स्वतंत्र रु. ५००/- शिक्षण संक्रमण शुल्क भरणे आवश्यक आहे-**

७. **वर्गणीचा कालावधी माहे जुलै २०२१ ते जून २०२२ असा राहील.**

८. इ.१०वी/इ.१२वी साठी फेब्रुवारी/मार्च२०२२च्या परीक्षेकरीता प्राप्त होणारे नोंदणी शुल्क हे आपण भरलेल्या विद्यार्थी संख्या व मंडळाकडे प्राप्त नियमित विद्यार्थ्यांची आवेदनपत्रांची संख्या यांची पडताळणी करण्यात येणार आहे, तेव्हा नोंदणी शुल्क भरतांना सदर बाबीची मुख्याध्यापक/प्राचार्यानी नोंद घ्यावी.

९. अपरिहार्य कारणास्तव चलनाद्वारे शुल्क जमा करता न आल्यास मंडळ कार्यालयात रोखीने जमा करण्यात यावे.

१०. या व्यतिरिक्त ज्या शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना जादा अंक पाहिजे असल्यास तसेच वैयक्तिक वर्गणीदार व इतर संस्था यांना आपली वर्गणी **सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, स.न.८३२ —ए फायनल प्लॉट नं.१७८ व १७९, बालचित्रवाणी जवळ, आघारकर रिसर्च इन्स्टिटयुट मागे, भाबुंर्डा, शिवाजीनगर,पुणे ४११००४** या नावे मनीऑर्डर अथवा डिमांड ड्राफ्टने पाठवावी. मनीऑर्डर फॉर्मवरील मजकुरासाठीजागा **(Sender Message)** या रकान्यामध्ये (आपणास टपालानेअंक पाठविण्यासाठी) आपले संपूर्ण नांव आणि जवळच्या खुणेसह तसेच पिनकोडसह संपूर्ण पत्ता, सुवाच्च अक्षरात अचुकपणे नमूद करावा.

वरील सर्व सूचनांची नोंद घेवून नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण शुल्क मंडळाकडे मागील वर्षाप्रमाणे पोष्टाने किवा हस्तपोहच पाठवावा मात्र **चलन दि.१० ऑगस्ट २०२१** पूर्वी काढलेला असावा. सदर दिनांकानंतर काढण्यात येणारे चलन दंडात्मक रक्कमेसह त्वरीत मंडळ कार्यालयाकडे पाठविण्यात यावे. **अन्यथा या संदर्भात कोणतीही स्मरणपत्र न पाठविता मंडळ मान्यता व सांकेतिक क्रमांक रद्द करण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल याची गांभीर्याने नोंद घ्यावी.**

विभागीय सचिव
महाराष्ट्र राज्य माध्य.व उच्च माध्य.शिक्षण मंडळ,
नाशिक विभागीय मंडळ, नाशिक—४२२ ००३.

प्रति,
सर्व मान्यता प्राप्त शाळा/कनिष्ठ महाविद्यालयातील मुख्याध्यापक/प्राचार्य
नाशिक/धुळे/जळगांव/नंदुरबार जिल्हे.

# नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण शुल्क पाठविण्याचा नमुना

नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण शुल्काची माहिती मंडळास सादर करतांना चलनासोबत
इ.१०वी/इ.१२ वी करीता स्वतंत्र प्रपत्र वापरावे.

| | | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| शाळा सांकेतांक | S | | | | | | | दुरध्वनी / भ्रमणध्वनी | | | | | | | | | |
| क. म.सांकेतांक | J | | | | | | | | | | | | | | | | |

जा.क्र./----------------
दिनांक :--------------

प्रति,
मा.विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
नाशिक विभागीय मंडळ,
नाशिक-४२२ ००१.

विषय :-**नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण शुल्क भरणेबाबत....**
संदर्भ :- आपले परिपत्रक क्र.नांविमं/लेखा/नों.शु./२०२१-२०२२/ दिनांक- / /२०२१

महोदय,
उपरोक्त संदर्भिय विषयास अनुसरून इ.१०वी/इ.१२वी सन२०२१-२०२२ या शैक्षणिक वर्षाचे शाळा/कनिष्ठमहाविद्यालयाचे मंडळ मान्यता शुल्क व शिक्षण संक्रमण अंकाच्या शुल्काचे चलन/डि.डि. या सोबत पाठविण्यात येत असून त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

**नोंदणी शुल्क (इ.१०वी/इ.१२वी)**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| शाळा सांकेतांक | S | | | | | | |
| कनिष्ठ महाविद्यालय सांकेतांक | J | | | | | | |

**सन२०२१-२०२२ करीता नोंदणी शुल्काचा तपशिल**

| नियमित विद्यार्थी संख्या | बँकेचे नांव | चलन क्रमांक/डि.डि./ रोख पावती क्रमांक | दिनांक | रुपये |
|---|---|---|---|---|
| | | | | |

---

**शिक्षण संक्रमण अंक शुल्क (इ.१०वी/इ.१२वी)**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| शाळा सांकेतांक | S | | | | | | |
| कनिष्ठ महाविद्यालय सांकेतांक | J | | | | | | |

**सन २०२१-२०२२ करीता शिक्षण संक्रमण अंक शुल्काचा तपशिल**

| नियमित विद्यार्थी संख्या | बँकेचे नांव | चलन क्रमांक/डि.डि./ रोख पावती क्रमांक | दिनांक | रुपये |
|---|---|---|---|---|
| | | | | ५००/- |

स्वाक्षरी
मुख्याध्यापक/प्राचार्य
शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाचा शिक्का

टिपः-
१. इ.१०वी /इ.१२वी करीता शिक्षण संक्रमण अंकाचे बँक ऑफ इंडियाचे चलन/डि.डि.वेगवेगळे पाठवावे.
२. इ.१०वी /इ.१२वी स्वतंत्र प्रपत्र पाठविणे आवश्यक आहे.
३. इ.१०वी /इ.१२वी नोंदणी शुल्काचे चलन/डि.डि.स्वतंत्र पाठवावेत.